International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# लोकसाहित्याच्या अभ्यासातील विविध संप्रदाय

**प्रा. डॉ. रावसाहेब ननावरे**

*प्राध्यापक व प्रमुख, मराठी विभाग, ॲड. एम.एन. देशमुख महाविद्यालय राजूर*

*Corresponding Author – प्रा. डॉ. रावसाहेब ननावरे*

**DOI - 10.5281/zenodo.20488292**

लोकसाहित्य हे मराठी साहित्य विश्वातील प्रमुख दालन आहे. मराठी साहित्य व संशोधनाच्या क्षेत्रात लोकसाहित्याच्या अभ्यासाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधे केल्या गेलेल्या शिफारशीत शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल सुचविला आहे. बहुद्देशीय व बहुविध शिक्षण प्रणाली अस्तित्वात आल्यामुळे विशिष्ट विद्याशाखेच्या मर्यादेपलीकडे जाऊन शिक्षण घेण्याची संधी अलीकडीलच्या विद्यार्थ्यांना प्राप्त झालेली आहे. विज्ञान , तंत्रज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना आपल्या आवडीप्रमाणे साहित्याचा अभ्यास करण्याची खुली संधी प्राप्त झाली आहे. पदवीच्या चौथ्या वर्षी त्यांना संशोधन क्षेत्रात संधी प्राप्त होते. त्यामुळे साहित्याच्या संशोधनाला चालना मिळू शकते. महानगरीय साहित्य, ग्रामीण साहित्य, लोकसाहित्य, आदिवासी साहित्य, दलित साहित्य अशा विविध साहित्य प्रवाहात संशोधन करता येईल. भारतीय ज्ञान प्रणाली अंतर्गत विवध प्रदेशातील लोक कथा, लोकगीत,लोकसंकृती व लोकभाषेचा अभ्यास करता येईल. लोकसाहित्याचे अभ्यास क्षेत्र विस्तृत आणि व्यापक आहे. लोकसाहित्यातील विविध संप्रदायाचा अभ्यास लोकसाहित्यातील संशोधकांना पूरक ठरू शकेल .

लोकसाहित्याच्या अभ्यासासंदर्भात अठराव्या शतकात लोकसाहित्याच्या संकलनाला प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांतीनंतर निरास आणि उदासवाण्या बनलेल्या कृत्रिम बंधनास ग्रामीण भागातील अकृत्रिम, साधेपणा व जिवंतपणा असलेल्या जीवनाचे आकर्षण निर्माण झाले.लोकभाषा व लोकसंकृती असलेल्या पारंपारिक गाणी, लोकगीते, लोककथा, लोकनाट्य, यांना महत्व प्राप्त झाले. साहित्यिक ग्रामीण भागाकडे वळले . लोकभावनांचा आदर होऊ लागला. लोकभाषा व लोकसंकृतीचे अध्ययन व संशोधन होऊ लागले. लोक साहित्य व लोक संकृतीच्या अभ्यासातील विविध संप्रदाय निर्माण झाले. या संप्रदायाने लोकसाहित्य आणि लोकसंकृतीच्या अभ्यासाला नवी दिशा दिली. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विवध संप्रदाय अस्तित्वात आले. भाषाशास्त्रीय संप्रदाय ,निसर्ग रुपकवादी संप्रदाय,भ्रांत संकल्पनावादी संप्रदाय,स्पष्टीकरणवाडी किंवा हेतूकथावादी संप्रदाय . मानव वंश शास्त्री संप्रदाय, मानसशास्त्रीय संप्रदाय,अवशेष वादी संप्रदाय, ऐतिहासिक व भौगोलिक संप्रदाय, वितरणवादी संप्रदाय, विसरणवादी संप्रदाय आदी संप्रदाय विकसित झाले. या संप्रदायाने लोकसाहित्याच्या अभ्सयाला विशिष्ठ गती आणि दिशा दिली आहे.

१. **भाषाशास्त्रीय संप्रदाय :** या संप्रदायाचा प्रारंभ जर्मन व ग्रीसमधे झालाआहे. या संप्रदायाच्या प्रवर्तकांनी शुद्ध भाषाशास्त्रीय आणि वाड.मयीन दृष्टीने लोक साहित्याचा अभ्यास करून वेगळे वळण लावले. दैवत कथांमधील मॅक्समुलरचा सिद्धांत असा की “ दैवत कथा या शुद्ध व अशुद्ध विकृत व्युत्पत्तीत जन्मलेल्या असुन त्यान भाषेला आलेली सूज किंवा भाषेला जडलेला रोग म्हणायला हरकत नाही . या भाषा

रोगांची मीमांसा म्हणजे दैवत कथाशास्त्र होय."१ या संप्रदायाला 'मायथोलॉजिकल' संप्रदाय असेही म्हणतात. या संप्रदायाचा पुरस्कर्ता थीओडर बेनेफ हा आहे. यांना दैवत कथा असलेल्या जाती या मूळ एकाच परिवारातील आहेत असे वाटते . बेनेफच्या मते दैवत कथांचे मूळस्थान भारत आहे. पंचतंत्र हा भारतातील एक मूळ कथासंग्रह आहे. समान दैवत कथांचे उगमस्थान एकच असून कथा व गाथा हया भाषा विकारामुळे उत्पन्न झाल्या आहेत. प्राकृतिक भाषा हे कथांचे मूळ असून मॅक्समुलरच्या मते सूर्यकथा हा तौलनिक दैवत कथांचा मूलाधार आहे. भाषा शास्त्रज्ञांनी आणि दैवत कथा शास्त्रज्ञांनी जगातील दैवत कथांचा संग्रह केला. कथांचे संकलन करून त्या संबंधी विवेचन केले. त्यातून भाषा भाषाशास्त्राची वृद्धी झाली. दैवतकथाशास्त्र ही प्रारंभी भाषा शास्त्राची एक शाखा होती .

२. **निसर्ग रुपकवादी संप्रदाय :** दैवत कथाशास्त्राचे दैवत कथात निसर्गात घडणाऱ्या घटनांचे प्रतिरूप चित्रण केलेले असते. असे मत मांडले जाते. यातून पुढे The nature symbolists या संप्रदायाचा जन्म झाला. दैवत कथांमध्ये निसर्ग कथा विशिष्ट कार्य करीत असतात. दैवत कथांमधील निसर्ग हा कोणत्याही गोष्टीचे प्रतिक आणि विचारमालिका यांस लोकसाहित्यातील दैवत कथांना विशेष महत्व असते. या संबंधी दुर्गा भागवत म्हणतात. " दैवतकथांना निसर्ग दृश्यातील विविध प्रतिके असतात. या विधानावर या संप्रदायाची उभारणी झाली आहे. " २ हे त्याचे विधान या संप्रदायाचे लोक साहित्याच्या संशोधनातील महत्व अधोरेखित करते. ग्रीक पुराण कथात सुद्धा निसर्गातील रूपकांचा आधार घेतला आहे. ग्रीक मधे सायकी म्हणजे फुलपाखरू" आणि डीमिटर म्हणजे वासंतिक धान्य समृद्धी होय . अशा प्रकारे जगभरातील लोकसाहित्यात निसर्ग रूपकांचा उपयोग केले आहे.

३. **भ्रांत संकल्पनावादी संप्रदाय :** हया संप्रदायाचा प्रवर्तक ह्युमरेस नावाचा शास्त्रज्ञ होता. त्यामुळे त्याच्या नावाने हा संप्रदाय ओळखला जातो. भ्रांत संकल्पनावादी संप्रदायाचे पुरस्कर्ते बानियर आणि लांप्रीअर हे आहेत. त्यांच्या मतानुसार दैवत कथा म्हणजे अवास्तव किंवा भ्रांत कल्पनेचा ऐतिहासिक सत्याशी मिलाफ आहे. रूपकवादी संप्रदायाचे अभ्यासक दैवत कथात निसर्गातील घटनांचे प्रतिके असतात असे मानतात तर भ्रांतवादी त्यात ऐतिहासिक सत्य दडलेले असते असे मानतात. प्रत्येक दैवत कथेत कोणतेतरी सत्य कल्पनागुंठीत स्वरुपात किंवा अवास्तव कल्पनांच्या आवरणाखाली दडलेले असते ही त्यांची धारणा असते. भ्रांतकल्पनावादात अवास्तव कल्पनांना खूप महत्व दिलेले असते. या संप्रदायाच्या अभ्यासाचे कार्यक्षेत्र दैवत कथा हे आहे.

४. **स्पष्टीकरणवादी किंवा हेतूकथावादी संप्रदाय:** दैवत कथा आणि भाषाशास्त्र यातून लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी निघालेला हा दृष्टीकोन संप्रदाय होय. या संप्रदायाच्या मते दैवतकथा या हेतूकथा असतात. लोकांना उपदेश करण्यासाठी , काही गूढ अनाकलनीय बाबींचे स्पष्टीकरण करण्यासाठी या कथा निर्माण झाल्या आहेत. असे या संप्रदायाचे म्हणणे आहे. दुर्गा भागवत यांच्या मते " बहुतेक सृष्टीचे स्पष्टीकरण मानवी व पाशवी कोटींच्या अनुशंगाने करण्याची प्रेरणा दैवत कथांतून दिसून येते. निसर्ग व संस्कृती यांच्या विकासाचे भाष्य अशा कथांत आढळते."३ दैवत कथा निसर्गाचे स्पष्टीकरण करण्यासाठी रूढी, सृष्टीत घडणारे बदल, नीतीनियम, सृष्टीतील गूढ यांच्या स्पष्टीकरणासाठी दैवत कथा निर्माण झाल्या आहेत. हे स्पष्ट होते.

५. **मानववंशवादी संप्रदाय :** इंग्रजीतील लोकसाहित्याचे अभ्यासक टायलर यांनी आपल्या ' प्रिमीटीव्ह कल्चर ' या ग्रंथात एक सिद्धांत मांडला आहे. " प्रत्येक जातीने आपल्या कथा गाथांची निर्मिती आपल्या क्षेत्रात स्वतंत्र स्वरुपात केली आहे. अशा कथा गाथा कोणत्याही जातीने इतर कोणाकडून उधार घेतल्या नाहीत. " ४ मानववंश शास्त्राच्या संप्रदायाच्या संदर्भात अॅड्रूयू लॉग यास स्कॉटलंडच्या इतिहासाचा उदगता मानला जातो. हा या मताचा पुरस्कर्ता होता. त्याच्या अभ्यासाने लोकसाहित्याच्या अभ्यासातील भाषाशास्त्राचे युग जाऊन मानववंश शास्त्राचे युग सुरु झाले.

६. **मानसशास्त्रीय संप्रदाय:** लोकसाहित्याच्या अभ्यास पद्धतीत मानसशास्त्रीय संप्रदायाला आज मान्यता मिळाली आहे. सिग्मड फ्राईड या मनोविश्लेषण शास्त्रज्ञाने सुप्त मनाची संकल्पना मांडली . मनोविश्लेषण शास्त्रज्ञांना लोककथात शारीरिक व्यापाराची प्रतीके दिसतात. मानवी मनात ज्या गूढ आणि सुप्त अशा अतृप्त इच्छा आकांक्षा आणि वासना असतात. त्यांचा अविष्कार लोक कथांत होतो. " फ्राईडीयन मनोविश्लेषण शास्त्राच्या आधारे कार्ल अब्राहम यांनी स्वप्ने आणि दैवत कथांचे अर्थ लावण्याचा प्रयत्न केला." ५ मानसशास्त्रीय तत्वानुसार लोक रूढी, लोक विश्वास , विधी इत्यादींचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. या दृष्टीने जोन्स ,एरिक फ्रोम आणि रोहीम यांनी लोकसाहित्याचा अभ्यास केला. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा मानसशास्त्रीय संप्रदाय एकेकाळी फार मान्यता पावलेला होता. अलीकडच्या काळात त्याचे महत्व कमी होऊ लागले आहे.

७. **अवशेषवादी संप्रदाय :** टायलर व लॅग हे या संप्रदायाचे प्रवर्तक मानले जातात. दुर्गा भागवत यांनी या संप्रदायाला जीवित्ववादी संप्रदाय असे संबोधले आहे. टायलर व लॅग यांनी दैवत कथांचा अभ्यास करताना असा निष्कर्ष काढला की मुळच्या या कथा रानटी लोकांत आढळून येतात. त्यांचे अविच्छिन्न जिवंत अवशेष सुसंस्कृत लोकांच्या मागाहून बनलेल्या कथांत आढळून येतात. ग्रीमच्या कथांमधून आढळून येणाऱ्या सरंजाम पद्धतीचे मूळ दूरदुरच्या रानटी जमातीमध्ये आढळतात. संस्कृती उत्क्रांतीचे तत्व स्वीकारून वन्य जमातीच्या परीकथा ,म्हणी व लोकभ्रमाचा विचार होऊ लागला तर समाज जीवनात प्रचलित असलेले लोकसाहित्य म्हणजे प्रचीन जीवनाचे अवशेष होय. ही भूमिका या संप्रदायाने स्वीकारलेली दिसते. डॉ. पुरुषोत्तम कालभूत यांच्या मते " सजीवावशेषत्ववादी संप्रदायात विचारसरणी प्रमाणे मुळच्या कथा रानटी लोकांत आढळतात.यांचे अवशेष सुसंस्कृत लोकांत आढळतात."६ हे विधान या संप्रदायाला पुष्टी देणारे आहे.

८. **ऐतिहासिक व भौगोलिक संप्रदाय:** ऐतिहासिक व भौगोलिक संप्रदायाचा जनक जे क्रोन हा फिनिश पंडित होता. हा संप्रदाय १८८१ च्या सुमारास उदघोषित केला. क्रोन याने पोवाड्याचा तौलनिक पद्धतीने कल्पना बंधनात्मक अभ्यास करताना भौगोलिक दृष्ट्या आजमावून पाहिले. तसेच त्याने त्या कल्पना बंधाचा ऐतिहासिक उगम मिळतो कि काय हे देखील तपासून पाहिले. त्यानंतर त्याने असे मत नोंदवले की लोकसाहित्याच्या अभ्यासात ऐतिहासिक व भौगोलिक पद्धतीला विशेष महत्व आहे. जे क्रोन यांच्या मतास लोकसाहित्याच्या समीक्षिका दुर्गा भागवत दुजोरा देताना म्हणतात " भारतीय कथांचे उगम आणि इतिहास यांची खरी शहानिशा याच पद्धतीने करावी लागेल . कारण भारताचा विस्तार त्याच्या संस्कृतीची प्रगल्भता , प्राचीनता, आणि जागतिक विस्तार लक्षात घेतल्यास हया पद्धतीशिवाय तरोनोपाय नाही." ७

९. **भारतमूलक सिद्धांत:** सर्व लौकिक कथा किंवा पारंपारिक कथा या भारतातून युरोपमध्ये आल्या. भारत हे जगामधील प्रचलित असलेल्या लोककथांचे, लोकगीतांचे ,कथा गीतांचे उगमस्थान आहे.थोडक्यात भारत हे या कथांचे मूळ आहे. असे या संप्रदायाचे समर्थक बेनेफ , इमॅन्यूएल कॅासकीन हे सांगतात. बेनेफ या संप्रदायाचा जनक मानला जातो. या संप्रदायाचा आधार घेऊन जगात सर्वत्र लोक कथांचे जाळे पसरले हे मानले जाते . या सिद्धांताच्या आधारे लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचा अभ्यास केला जातो.

१०. **वितरणवादी संप्रदाय:** दुरदुरच्या प्रदेशातील कथांचे साम्य ग्रीमच्या काळातील विद्वानाच्या लक्षात आले होते. फिनलंड मधे क्रोन व आर्न यांनी यांनी कथा विस्तारच्या दृष्टीने अभ्यास केलाआहे. एकाच कथेचे मिळतील तेवढे पर्याय गोळा करायचे आणि त्या पर्यायावरून आद्य स्वरूप असलेली कथा तयार करायाची. या संप्रदायामध्ये दुरदुरच्या कथांतील साम्यांना अर्थ प्राप्त होऊ लागला .

११. **विसरणवादी संप्रदाय:** विसरणवादी सिद्धांताचा परिपोष करणारा हा संप्रदाय मानवशास्त्रीय अभ्यासाचीच एक शाखा आहे.भौगोलिक परिसीमा आणि वांशिक संस्कृती या सिद्धांताचा मुख्य गाभा आहे. जगभरातील वन्य संस्कृतीचे धागे दोरे प्रगल्भ राष्ट्राच्या संस्कृतीतही सापडतात. हे सत्य प्रस्थापित झाल्यानंतर वेगवेगळ्या सांस्कृतिक कल्पनांची व आचार विचारांची प्रादेशिक विभागणी लक्षात घेऊन प्रत्येक प्रसारणाचा भौगोलिक नकाशांचा अभ्यास अभ्यासक करू लागले . कुठलातरी वन्य प्रदेश कल्पून तिथल्या सांस्कृतिक आचार विचारांचा फैलाव परदेशात किती दूरवर गेलेला आहे याचा तपशील अभ्यासक व संशोधक घेऊ लागले . या पद्धतीला पुढे विसरण पद्धती असे नाव देण्यात आले.

लोकसाहित्याच्या आधुनिक संशोधन पद्धतीत भाषाशात्रीय संप्रदाय, निसर्ग रुपकवादी संप्रदाय, भ्रांत संकल्पनावादी संप्रदाय, स्पष्टीकरणवाडी किंवा हेतूकथावादी संप्रदाय.मानववंश शास्त्री संप्रदाय, मानसशास्त्रीय संप्रदाय,अवशेषवादी संप्रदाय, ऐतिहासिक व भौगोलिक संप्रदाय, भारतमूलक सिद्धांत, वितरणवादी संप्रदाय, विसरणवादी संप्रदाय हे संप्रदाय महत्वाचे आहेत.याच संप्रदायाच्या आधरे लोकसाहित्य वा लोकसंस्कृतीच्या अभ्यास पद्धतीची पायाभरणी झाली आहे.या सर्व संप्रदायाच्या अभ्यासामुळे विश्वातील लोकसाहित्याच्या अभ्यासाल योग्य दिशा मिळाली आहे. हया संप्रदायाचे जनक व प्रवर्तक यांची संशोधनाची बैठक शास्त्रीय, तार्किक आणि विज्ञाननिष्ठ असल्यामुळे लोक साहित्याच्या संशोधनाला गती मिळाली आहे. या संप्रदायांच्या विचारसरणीत शास्त्रीय बैठक असल्यामुळे आधुनिक संशोधन पद्धतीला पूरक आहे. एका विचारपरंपरेतून दुसऱ्या संप्रदायाला आधार मिळाला.त्यातून लोकसाहित्याच्या संशोधला विशिष्ट बैठक प्राप्त झाली आहे हेच या संप्रदायाच्या अभ्यासाचे गमक आहे.

**संदर्भ:**


१. भागवत दुर्गा , लोकसाहित्याची रूपरेखा .पृष्ठ १९
२. तत्रेव पृष्ठ २४
३. तत्रेव पृष्ठ ३०५. कालभूत
४. कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ.जाने २००७ ,पृष्ठ ४५
५. भागवत दुर्गा उदृत लोकसाहित्याचे स्वरूप, प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन. अहमदनगर, चौ.आ.२००० पृ.१२१
६. उ. नि. संदर्भ ४ पृष्ठ ४७
७. उ. नि. संदर्भ १ पृष्ठ ३७